नियमीत फौजदारी खटला क्र. **६/२०२४**
निशाणी क्र. **१३/क**

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. **०१** यांची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की :

| | | |
|---|---|---|
| माझे संपूर्ण नांव | : | **प्रिती जयवंत तांबडकर** |
| वय सुमारे | : | ३९ वर्षे, व्यवसाय : गृहीणी |
| निवासस्थान | : | मु. सुडकोली, ता. अलिबाग, जि. रायगड |

**<u>सरतपासणी सरकारतर्फे विशेष सहाय्यक सरकारी वकील श्रीमती एस्. एम्. छापेकर यांचेमार्फत</u>** :

सन २०२३ मध्ये मी सरपंच म्हणून ग्रामपंचायत सुडकोली येथे कार्यरत होते. आता मी माजी सरपंच आहे. ग्रामपंचायत कार्यालयामध्ये तीन कर्मचारी आहेत. त्यांची नावे सुदर्शन महाडीक, हेमंत महाडीक व अविनाश वावेकर अशी आहेत. ग्रामपंचायतीच्या कार्यालयाची वेळ सकाळी १०.०० ते सायं. ५.०० अशी आहे. माझ्या कामाच्या स्वरुपामध्ये दाखले देणे, भांडण मिटविणे, गावातील विजपुरवठा संदर्भात पाहणी करणे इत्यादींचा समावेश होतो.

०२. ग्रामपंचायतीमध्ये चार मासिक सभा असतात. त्या जानेवारी, जून, नोव्हेंबर व डिसेंबरमध्ये घेतल्या जातात. दि. २५/०५/२०२३ रोजी मी घरी होते व माझे पती कामानिमित्त ग्रामपंचायतीमध्ये गेले होते. तेथे दिपक म्हात्रे हजर होते. दिपक म्हात्रेने माझ्या कर्मचाऱ्यांना विचारले की, सरपंच कुठे आहेत? त्यावर माझ्या कर्मचाऱ्यांनी माझ्या पतीकडे विचारणा करण्यास सांगितले. त्यावर दिपक म्हात्रे बोलले की, ते सरपंच नाहीत त्यांची पत्नी सरपंच आहे त्यांना बोलवा. त्यानंतर माझा कर्मचारी मला घरी बोलावण्यास आला व मला ग्रामपंचायत कार्यालयात दिपक म्हात्रेने बोलावले आहे असे मला सांगितले. त्यानंतर मी जावून माझ्या

केबीनमध्ये बसले व त्याला आवाज दिला. त्यानंतर मी त्याला सांगितले की, अर्ज दे व नंतर ये. दिपक म्हात्रेला ग्रामसभा आयोजित करावयाची होती. तो माझ्या केबीनमध्ये आला व मला शिवीगाळ केली की, ‘आयझवाडे, सभा कधी लावणार आहेस’ व मला खुर्चीवरुन खेचले. त्यानंतर केबीनच्या बाहेर येवून त्याने मला शिवीगाळ केली. त्याने मला शिवी दिल्यानंतर मला लाज वाटली. शिवी लाज वाटेल अशी होती. माझे पती उपस्थित होते. त्याने माझ्या पतीला जीवे मारण्याची धमकी दिली. त्यानंतर मी पोलीस ठाण्यात गेले. सदर घटना १०.४५ वाजता घडली होती. पोलीस ठाण्यात मी फिर्याद दिली. पोलीसांनी माझी फिर्याद घेतली. आता मला दाखवण्यात आलेली फिर्याद तिच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र. १४** देण्यात येते.

०३. पोलीस पंचनाम्यासाठी सायं. ७.०० वाजता ऑफीसमध्ये आले होते. मी फिर्याद दिली त्या संदर्भात पंचनाम्यासाठी पोलीस आले होते. पोलीसांनी मोबाईलमध्ये रेकॉर्डींग करुन घेतले होते. पोलीसांनी घटनास्थळाचा पंचनामा लिहून घेतला होता. घटनास्थळी दोन पंच होते. पोलीसांनी मला अलिबाग येथील न्यायालयात माझ्या जबानीकरीता बोलावले होते. माझी कोर्टात जबानी झाली होती. (साक्षीदारास फौजदारी प्रक्रिया संहीता कलम १६४ चा जबाब दाखवण्यात आला.) जबाबावर माझी सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र. १५** देण्यात येते. आरोपी आज कोर्टात हजर आहे. मी त्यास ओळखते.

**सरतपास पूर्ण**.

**<u>उलटतपास आरोपीकरीता वकील श्री. बी. जी. पाटील यांचेमार्फत</u>** :

०४. सन २०१९ मध्ये मी सरपंच झाले. मी रस्ते बांधले, संरक्षण भिंती

केल्या, अशी कामे केलेली आहेत. मी बौद्धवाडी येथे रस्त्याचे काम केलेले आहे. त्या कामाची निविदा माझ्या पतीला मिळाली होती व सदरचे काम माझ्या पतीने केलेले आहे. ग्रामपंचायत सदस्य किंवा ग्रामपंचायतीच्या सदस्याचा परिवार किंवा नातेवाईकाने ग्रामपंचायतीच्या मार्फत सरकारी कामे करायची नसतात. हे म्हणणे खरे आहे की, सरकारी कामे नातेवाईकांनी करावयाची नसतानाही मी माझ्या पतीला रस्त्याचे काम दिले होते.

०५. हे म्हणणे खरे आहे की, मी व माझे पती शेतकरी कामगार पक्षाचे कार्यकर्ते आहोत. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी हा शिवसेनेचा कार्यकर्ता आहे. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीचे असे म्हणणे होते की, माझ्या पतीने बौद्धवाडी येथील रस्त्याच्या कामामध्ये भ्रष्टाचार केलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझे पती ग्रामपंचायतीचे सदस्य व कार्यकर्ता नाहीत.

०६. माझे पती दि. २५/०५/२०२३ रोजी ग्रामपंचायतीमध्ये कोणत्या कामासाठी गेले होते हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी सरपंच असतानाही ग्रामपंचायतीचे सर्व काम माझे पती पाहात होते.

०७. मी पोलीसांना फिर्याद देताना सांगितले होते की, मी आरोपीला सांगितले होते की अर्ज लिहा व नंतर या. सदर बाब माझ्या फिर्यादमध्ये नमूद नसल्याचे कारण मला सांगता येणार नाही.

०८. तथाकथीत भांडण होण्यापूर्वी आरोपी १० मिनिटांपूर्वी माझ्या केबीनमध्ये आला होता. त्यावेळी केबीनमध्ये कोणीही नव्हते. ग्रामपंचायत कार्यालयामध्ये सी.सी.टी.व्ही. कॅमेरे लावलेले होते. साक्षीदार स्वत:हून सांगतो की,

कॅमेरे बंद स्थितीत होते. मी सरपंच झाल्यानंतर ५–६ महिन्यानंतर सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बसविले होते. तथाकथीत भांडणापूर्वी १–२ महिन्यांपूर्वीपासून सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बंद होते. सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बसविण्यासाठी ग्रामपंचायतीचा निधी होता. सी.सी.टी.व्ही. कॅमेरे दुरुस्त करण्यासाठी मी ग्रामसेवकांना सांगितले होते.

०९. हे म्हणणे खरे आहे की, तथाकथीत घटनेच्या वेळेस केबीनमध्ये कोणीही हजर नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, ग्रामसेवकाच्या ऑफीसमधून सरपंचाच्या केबीनमधील काहीही दिसत नाही. माझ्या केबीनमधील टेबल ५ फुटांचा आहे. आरोपीने मला टेबलच्या बाजूने खेचले होते. त्याने मला उजव्या बाजूने ओढले होते. उपसरपंचाची खुर्ची माझ्या बसण्याच्या उजव्या बाजूला आहे. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीने माझा हात धरुन ओढताना हॉलमधील कोणीही पाहिलेले नाही.

१०. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने मला 'आयझवाडे, सभा कधी लावणार आहेस अशी शिवी दिली व मला खुर्चीवरुन खेचले', हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीने मला इतर कुठेही हात लावलेला नाही. तथाकथीत केबीनमधील घटना पाच मिनिटे चालली. माझ्या पतीमध्ये व आरोपीमध्ये मारहाण झाली नव्हती. भांडण झाले नसल्यामुळे मारहाण सोडविण्यासाठी कोणी आले नाही.

११. ग्रामपंचायत कार्यालयामध्ये चार सी.सी.टी.व्ही. कॅमेरे आहेत व ते चारही सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बंद होते. हे म्हणणे खरे आहे की, घटनेपूर्वी माझे पती व आरोपीमध्ये कुठलाही वाद नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी व आमच्यात राजकीय वैर होते. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने माझ्या पतीला

जीवे मारण्याची धमकी दिली, हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने शिवीगाळ केली व त्यामुळे माझे मनास लज्जा उत्पन्न झाली, हे मी खोटे सांगत आहे.

१२. पोलीसांनी पंचनामा करतेवेळी जागेचे रेकॉर्डींग केले होते. सदरचे रेकॉर्डींग मी पाहिलेले नाही. पोलीसांनी आणखी काही रेकॉर्डींग केले नाही. माझी फिर्याद पोलीसांनी अंदाजे दुपारपर्यंत घेतली होती. फिर्याद लिहून झाल्यानंतर मी घरी निघून गेले. मी अंदाजे सायं. ६.०० ते ६.३० वाजता घरी गेले. पोलीस पंचनाम्यासाठी आले तेव्हा मी घरी होते. पोलीस पंचनाम्यासाठी भांडण झाले त्या दिवशीच आले होते. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी माझ्या पतीच्या कामाला विरोध करत असल्यामुळे मी आरोपीविरुद्ध खोटी केस केलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी व माझ्या पतीने संगनमत करुन खोटी फिर्याद व खोटा जबाब दिलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने कोणतीही शिवीगाळ केली नाही व धमकी दिली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

अलिबाग. ( **एम्. बी. अत्तार** )
दिनांक : **१२/०६/२०२५**. मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड–अलिबाग.

नियमीत फौजदारी खटला क्र. **६/२०२४**
निशाणी क्र. **१७/क**

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. **०२** यांची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की :

| | | |
|---|---|---|
| माझे संपूर्ण नांव | : | **रघुनाथ नारायण तांबडकर** |
| वय सुमारे | : | ७१ वर्षे, व्यवसाय : शेती |
| निवासस्थान | : | मु. सुडकोली, ता. अलिबाग, जि. रायगड |

**<u>सरतपासणी सरकारतर्फे सहाय्यक सरकारी वकील श्री. प्रसाद पाटील पाटील यांचेमार्फत</u>** :

दि. २५/०५/२०२३ रोजी सुडकोली ग्रामपंचायतीमध्ये दिपक म्हात्रे व सरपंच प्रिती जयवंत तांबडकर यांच्यामध्ये भांडण झाले होते. मी आवाज ऐकल्यानंतर तेथे धावत गेलो. त्यावेळी दिपक म्हात्रे केबीनच्या बाहेर उभे होते. मी जाण्यापूर्वी त्यांचे भांडण मिटले होते. पंचनामा सायं. ७.०० वाजता माझ्या समक्ष झाला. पंचनामा अर्धा ते एक तास चालला होता. पंचनाम्याच्या वेळी पोलीस हवालदार, मी, जयवंत तांबडकर, रमेश म्हात्रे हजर होते. घटनास्थळ प्रिती जयवंत तांबडकर यांनी दाखविले. घटनास्थळ सुडकोली ग्रामपंचायत होते. ग्रामपंचायतीमध्ये तीन खोल्या आहेत. भांडण सरपंचांच्या केबीनमध्ये झाले होते.

०२. पोलीसांनी पंचनाम्यामध्ये केबीनचे मोजमाप लिहीले होते, खुर्च्या व टेबल किती आहेत यासंदर्भात लिहीले होते. घटनास्थळाच्या आजूबाजूला बालवाडी, तांबडकर यांचे घर आहे, समोर रस्ता आहे. मला पंचनामा

दाखवल्यास मी ओळखू शकेन. आता मला पंचनामा वाचून दाखवण्यात आला. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यावर अनु. क्र. १ वर माझी सही आहे. त्यास **निशाणी क्र. पी—३** म्हणजेच **निशाणी क्र. १८** देण्यात येते. पोलीसांनी घटनास्थळाचा पंचनामा करतानाचे फोटो काढले होते. आता मला दाखवलेले पाच फोटो पंचनामा करताना काढलेले आहेत. त्यास एकत्रितपणे **आर्टीकल 'ए'** देण्यात येते. मी आरोपीला ओळखतो. तो आज न्यायालयात हजर आहे.

**सरतपास पूर्ण**.

**उलटतपास आरोपीकरीता वकील श्री. बी. जी. पाटील यांचेमार्फत** :

०३. पंचनाम्याकरीता मी सायं. ७.०० वाजता गेलो होतो. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळी भांडण झाले असे दिसण्यासारखे काही पडलेले नव्हते. पोलीसांनी माझ्या समक्ष खोलीची मोजमापे घेतली होती. हे म्हणणे खरे आहे की, माझे ग्रामपंचायतीमध्ये नेहमी येणे जाणे असते. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळ मला पूर्वीपासून माहिती आहे.

०४. जयवंत तांबडकर माझा पुतण्या आहे. फिर्यादी प्रिती तांबडकर माझी सून लागते. हे म्हणणे खरे आहे की, पंचनामा सरपंचांच्या केबीनमध्ये केला. हे म्हणणे खरे नाही की, केबीन व्यतिरिक्त माझ्या समक्ष मोजमापे घेतली नव्हती. ग्रामसेवकाच्या केबीनचे मोजमाप घेतले होते. हे म्हणणे खरे आहे की, ग्रामसेवकाच्या केबीनमध्ये भांडण झाले नव्हते.

०५. हे म्हणणे खरे नाही की, मी पंचनाम्यासाठी गेलो होतो हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या समक्ष पंचनामा करण्यात

आला हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, तयार पंचनाम्यावर पोलीसांनी माझी सही घेतलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

अलिबाग. ( **एम्. बी. अत्तार** )
दिनांक : **१६/०७/२०२५**. मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड–अलिबाग.

नियमीत फौजदारी खटला क्र. **६/२०२४**
निशाणी क्र. **२०/क**

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. **०३** यांची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की :

| | | |
|---|---|---|
| माझे संपूर्ण नांव | : | **सुहास परशुराम पाटील** |
| वय सुमारे | : | ३१ वर्षे, व्यवसाय : शेती |
| निवासस्थान | : | मु. सुडकोली, ता. अलिबाग, जि. रायगड |

**<u>सरतपासणी सरकारतर्फे सहाय्यक सरकारी वकील श्री. पी.एस्. पाटील यांचेमार्फत</u>** :

दि. २२/०६/२०२३ रोजी मी रेवदंडा पोलीस ठाण्यात एका कागदावर सही केली. आता मला माझी सही दाखवण्यात आली. पंचनाम्यावर अनु. क्र. २ वर माझी सही आहे. त्यातील मजकूर मला माहीत नाही.

**(साक्षीदार पूर्वी दिलेल्या जबानीपेक्षा विसंगत साक्ष देत असल्याने सरकारी अभियोक्ता यांनी साक्षीदाराचा उलटतपास घेण्याची परवानगी मागितली. परवानगी दिली.)**

**<u>उलटतपास सरकारतर्फे सहाय्यक सरकारी वकील श्री. पी.एस्. पाटील यांचेमार्फत</u>** :

०२. हे म्हणणे खरे आहे की, प्रिती तांबडकर ह्या सुडकोली ग्रामपंचायतीच्या सरपंच आहेत. मी त्यांना ओळखतो. हे मला माहीत नाही की, आरोपी व प्रिती तांबडकर यांच्यात वादावादी झाली होती. हे म्हणणे खरे आहे की, मी ज्यावेळी पोलीस ठाण्यात गेलो होतो त्यावेळी प्रिती तांबडकर ह्या पोलीस ठाण्यात हजर होत्या. हे म्हणणे खरे नाही की, प्रिती तांबडकर यांना झालेल्या मारहाणीचे चित्रीकरण मला पोलीस ठाण्यात दाखवण्यात आले. मी आरोपीला ओळखतो. तो माझ्या ओळखीचा आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीला शिक्षा

होवू नये म्हणून मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण**.

**<u>उलटतपास आरोपीकरीता वकील श्री. बी. जी. पाटील यांचेमार्फत</u>** :

उलटतपास नाकारला.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

अलिबाग. ( **एम्. बी. अत्तार** )

दिनांक : **१८/०८/२०२५**. मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड–अलिबाग.

नियमीत फौजदारी खटला क्र. **६/२०२४**
निशाणी क्र. **२२/क**

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. **०४** यांची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की :

| | | |
|---|---|---|
| माझे संपूर्ण नांव | : | **अविनाश रघुनाथ वावेकर** |
| वय सुमारे | : | ३८ वर्षे, व्यवसाय : नोकरी (ग्रामपंचायत लिपीक) |
| निवासस्थान | : | मु. पो. सुडकोली, ता. अलिबाग, जि. रायगड |

**<u>सरतपासणी सरकारतर्फे सहाय्यक सरकारी वकील श्री. प्रसाद पाटील यांचेमार्फत</u>** :

मी ग्रामपंचायत कार्यालयात क्लार्क म्हणून कार्यरत आहे. माझ्या ड्युटीची वेळ सकाळी १०:०० ते सायं. ६:०० अशी आहे. घटना सन २०२३ मध्ये २५ तारखेला घडली होती. त्या दिवशी दिपक म्हात्रे ग्रामपंचायतीमध्ये येवून आम्हाला म्हणाले की, सरपंचांसोबत मिटींग करायची आहे. आम्ही तिघे कर्मचारी म्हणजेच मी, हेमंत दत्ता महाडीक, सुदर्शन दत्ता महाडीक यांना सांगितले. त्यावेळी सरपंचांचे पती जयवंत तांबडकर हे ग्रामपंचायतीमध्ये उपस्थित होते. सरपंचांच्या पतीने सांगितले की, सरपंचांना बोलवा. सरपंच मॅडम ग्रामपंचायतीमध्ये आल्या व त्या त्यांच्या केबीनमध्ये जावून बसल्या. त्यांच्या पाठोपाठ त्यांचे पतीही केबीनमध्ये जावून बसले. त्यानंतर दिपक म्हात्रे त्यांच्याशी चर्चा करण्यासाठी गेले. ते केबीनच्या बाहेरुनच बोलत होते. आम्ही आमच्या कामातच होतो व त्यांची वादावादी चालू होती. पुढे काय झाले ते मी पाहिले नाही.

**(साक्षीदार पूर्वी दिलेल्या जबानीपेक्षा विसंगत साक्ष देत असल्याने सरकारी अभियोक्ता यांनी साक्षीदाराचा उलटतपास घेण्याची परवानगी मागितली. परवानगी दिली**.)

**<u>उलटतपास सरकारतर्फे सहाय्यक सरकारी वकील श्री. प्रसाद पाटील यांचेमार्फत</u>** :

०२. हे म्हणणे खरे आहे की, पोलीस चौकशीसाठी ग्रामपंचायतीमध्ये आले होते. पोलीसांनी माझ्याकडे चौकशी केली होती. हे म्हणणे खरे आहे की, मी माझ्याप्रमाणे पोलीसांना जबाब दिला होता. आता मला माझ्या जबाबातील **अधोरेखांकित भाग ‘अ**’ वाचून दाखवला. तो मी पोलीसांना सांगितला नव्हता. पोलीसांनी तसे माझ्या जबाबात का लिहीले ते मी सांगू शकत नाही. आरोपीला मी ओळखतो. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीला शिक्षा होवू नये असे मला वाटत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी त्यामुळे आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण**.

**<u>उलटतपास आरोपीकरीता वकील श्री. बी. जी. पाटील यांचेमार्फत</u>** :

उलटतपास नाकारला.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

अलिबाग. ( **एम्. बी. अत्तार** )

दिनांक : **१०/०९/२०२५**. मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड–अलिबाग.

नियमीत फौजदारी खटला क्र. **६/२०२४**
निशाणी क्र. **२३/क**

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. **०५** यांची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की :

| | | |
|---|---|---|
| माझे संपूर्ण नांव | : | **हेमंत दत्ता महाडीक** |
| वय सुमारे | : | ३० वर्षे, व्यवसाय : नोकरी (ग्रामपंचायत शिपाई) |
| निवासस्थान | : | मु. कुदे, पो. सुडकोली, ता. अलिबाग, जि. रायगड |

**<u>सरतपासणी सरकारतर्फे सहाय्यक सरकारी वकील श्री. पी.एस्. पाटील यांचेमार्फत</u>** :

मी ग्रामपंचायत कार्यालयात शिपाई म्हणून कार्यरत आहे. माझ्या ड्युटीची वेळ सकाळी १०:०० ते सायं. ६:०० अशी आहे. मी ड्युटीवर हजर असताना त्यावेळी दिपक म्हात्रे ग्रामपंचायतीमध्ये आले. घटनेची तारीख मला आता आठवत नाही. दिपक म्हात्रे म्हणाले की, सरपंच मॅडमना बोलवा. त्यानंतर सरपंच मॅडम आल्या व त्या त्यांच्या केबीनमध्ये गेल्या. दिपक म्हात्रे केबीनच्या बाहेर उभे होते. मी माझे काम करत होतो. दिपक म्हात्रे व सरपंच मॅडममध्ये काय झाले ते मी पाहिले नाही.

**(साक्षीदार पूर्वी दिलेल्या जबानीपेक्षा विसंगत साक्ष देत असल्याने सरकारी अभियोक्ता यांनी साक्षीदाराचा उलटतपास घेण्याची परवानगी मागितली. परवानगी दिली**.)

**<u>उलटतपास सरकारतर्फे सहाय्यक सरकारी वकील श्री. प्रसाद पाटील यांचेमार्फत</u>** :

०२. हे म्हणणे खरे नाही की, दिपक म्हात्रे काय करत होते हे मला दिसत होते. पोलीसांनी माझ्याकडे चौकशी केली होती. हे म्हणणे खरे आहे की, मी माझ्याप्रमाणे पोलीसांना जबाब दिला होता. आता मला माझ्या जबाबातील

**अधोरेखांकित भाग 'अ**' वाचून दाखवला. तो मी पोलीसांना सांगितला नव्हता. पोलीसांनी तसे माझ्या जबाबात का लिहीले ते मी सांगू शकत नाही. आरोपीला मी ओळखतो. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीला शिक्षा होवू नये असे मला वाटत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी त्यामुळे आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण**.

**<u>उलटतपास आरोपीकरीता वकील श्री. बी. जी. पाटील यांचेमार्फत</u>** :

उलटतपास नाकारला.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

अलिबाग. ( **एम्. बी. अत्तार** )
दिनांक : **१०/०९/२०२५**. मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड—अलिबाग.

नियमीत फौजदारी खटला क्र. **६/२०२४**
निशाणी क्र. **३४/क**

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. **०६** यांची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की :

| | | |
|---|---|---|
| माझे संपूर्ण नांव | : | **जयवंत बाळाराम तांबडकर** |
| वय सुमारे | : | ४५ वर्षे, व्यवसाय : शेती |
| निवासस्थान | : | मु. पो. सुडकोली, ता. अलिबाग, जि. रायगड |

**<u>सरतपासणी सरकारतर्फे सहाय्यक सरकारी वकील श्री. पी.एस्. पाटील यांचेमार्फत</u>** :

०१. दि. २५/०५/२०२३ रोजी ग्रामपंचायत कार्यालय सुडकोली येथे सकाळी १०:४५ वाजता घडली. तेव्हा मी माझ्या कामानिमित्त ग्रामपंचायत कार्यालयात गेलो होतो त्यावेळी दिपक म्हात्रे तेथे आला होता. त्यावेळी त्याने विचारले की, सरपंच कुठे आहेत? माझी पत्नी सरपंच म्हणून कार्यरत होती. मी त्याला विचारले की, तुझे काही काम आहे का? त्यावर तो म्हणाला की माझे सरपंचांशी काम आहे.

०२. त्यानंतर मी माझ्या पत्नीला बोलावण्यासाठी शिपायाला पाठविले. माझी पत्नी कार्यालयात आली व तिच्या केबीनमध्ये बसली. तेथे केबीनच्या बाहेर माझा व दिपक म्हात्रे याचा शाब्दीक वाद व झटापट झाली. त्यानंतर आम्ही पोलीस ठाण्यात गेलो. दिपक म्हात्रे हा सरपंचांच्या केबीनमध्ये गेला होता. त्यावेळी मी हॉलमध्ये बसलो होतो. केबीनमध्ये काय झाले ते मला आठवत नाही. माझा मोबाईल घेवून कोणीतरी शूटींग केली. त्यानंतर मी पोलीस ठाण्यात गेलो.

(**साक्षीदार पूर्वी दिलेल्या जबानीपेक्षा विसंगत साक्ष देत असल्याने सरकारी अभियोक्ता यांनी साक्षीदाराचा उलटतपास घेण्याची परवानगी मागितली. परवानगी दिली**.)

**<u>उलटतपास सरकारतर्फे सहाय्यक सरकारी वकील श्री. पी.एस्. पाटील यांचेमार्फत</u>** :

०३. हे माझ्या लक्षात नाही की, आरोपीने माझ्या पत्नीला ‘आयझवाडे’ अशी शिवीगाळ केली. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने माझ्या पत्नीला खुर्चीवरुन खेचून ऑफीसच्या बाहेर काढले. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी माझ्या पत्नीच्या अंगावर धावून गेला होता.

**उलटतपास पूर्ण**.

**<u>उलटतपास आरोपीकरीता वकील श्री. बी. जी. पाटील यांचेमार्फत</u>** :

०४. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीचे व माझे सन २०१९ पूर्वी कोणतेही वाद नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, सन २०१९ पूर्वी आम्ही दोघे एकाच पक्षाचे काम करत होतो. हे म्हणणे खरे आहे की, २०१९ नंतर आरोपीने पक्ष बदलला व ग्रामपंचायतीच्या सदस्य पदासाठी उमेदवार म्हणून उभा राहिला.

०५. हे म्हणणे खरे आहे की, तेव्हापासून आमच्यात राजकीय वाद निर्माण झाले. सरपंच कुठे आहेत ही बाब मी पोलीसांना जबाब देताना सांगितली होती. तुझे काही काम आहे का असे मी आरोपीला विचारले ही बाब मी पोलीसांना जबाब देताना सांगितली होती. आरोपी व माझ्यात झटापट झाली ही बाब मी पोलीसांना जबाब देताना सांगितली होती. मी हॉलच्या बाहेर बसलो होतो ही बाब मी पोलीसांना जबाब देताना सांगितली होती. सदर बाबी माझ्या जबाबात नमूद नाहीत. त्या का नमूद नाहीत याचे कारण मी सांगू शकत नाही.

०६. माझा मोबाईल शुटींगसाठी कोणी घेतला होता हे मला माहीत नाही. चित्रीकरण मी माझ्या मोबाईलमध्ये केले होते हे मी पोलीसांना सांगितले नव्हते.

सदर बाब पोलीसांनी माझ्या जबाबात चुकीची नमूद केलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी बौद्धवाडी आदीवासीवाडी येथील रस्त्याचे काम केले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्या गोष्टीवरुनच माझे व आरोपीचे वाद होते. हे म्हणणे खरे नाही की, त्या वादातूनच आम्ही आरोपीवर खोटी केस दाखल केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

अलिबाग.
दिनांक : **२३/१२/२०२५**.

( **एम्. बी. अत्तार** )
मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड–अलिबाग.